# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

कालमर्यादा
दिनांकः २५.०७.२०१६

क्रमांक :२/एनजीसी/मुदतठेव/नवीन अ./क्षमतावाढ/२०१६-१७/ ९०१
दिनांक : 15 JUL 2016

प्रति,
अध्यक्ष/सचिव,

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र पदवी तसेच एमबीए, एमएमएस व पीजीडीएम या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थामध्ये नवीन पदवी /पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमतेत वाढ करणे इ. बाबत संचालनालयाची मान्यता देण्याबाबत.

संदर्भ : १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.२४३/तांशि-४ दि. ०७.०७.२०१६

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.२४४/तांशि-४ दि. १२.०७.२०१६

३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.२७०/तांशि-४ दि.७.७.१६

४. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.३३४/तांशि-४ दि.१५.७.१६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन निर्णयांन्वयें शासनाने आपल्या संस्थेस खालील अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून त्यासमोर नमूद करण्यात आलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचा स्तर | अभ्यासक्रमाचे नाव | शै.व.२०१५-१६ ची प्रवेशक्षमता | शै.व.२०१६-१७ साठी मंजूर प्रवेशक्षमता | नियतठेवीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

तरी, त्या अनुषंगाने आपल्या संस्थेस संचालनालयाची मान्यता देण्यासाठी खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता तात्काळ करण्यात यावी. जेणेकरुन अभ्यासक्रम सुरु करण्यास व प्रवेश सुरु करण्यास मान्यता देणे या संचालनालयास सुलभ होईल.

१. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तूकला परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या मान्यतेचे पत्र, शासन मान्यतेचे पत्र, विद्यापीठाचे मान्यता पत्र इत्यादी पत्रांच्या साक्षांकित प्रती व या पत्राची छायांकित प्रत.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयात भरण्यात आलेल्या नोंदणी शुल्काच्या रकमेच्या पावतीची छायांकीत प्रत.
३. रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रपत्र अ व ब मध्ये विहित केलेल्या नमुन्यात नोदंणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करावे. (सोबत हमीपत्राच्या मसुद्याची प्रत जोडली आहे.)
४. हमीपत्राच्या मसुद्यात दर्शविण्यात आलेल्या विहीत तक्त्यात सदर संस्था सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची माहिती समाविष्ट करण्यांत यावी.
५. तसेच हमीपत्रात दर्शविण्यात आलेल्या विहित तक्त्यात सदर अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यांत आलेली पुस्तके, संगणक, यंत्रसामुग्री तसेच फर्निचर बाबतची माहिती सादर करण्यात यावी.

६. नवीन संस्थेसाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संस्थाचालक यांच्या संयुक्त खात्यात सोबत जोडलेल्या शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि-४, दिनांक २१.०८.२०१३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार राष्ट्रीयकृत किंवा शेडयुल्ड बँकेत १० वर्षे मुदतीसाठी मुदतठेव जमा करण्यात यावी. तसेच संयुक्त खात्यात नियत ठेव ठेवण्यासाठी बँकेचा नमुना स्वाक्षरी फॅार्म संस्थाचालक हयांच्या स्वाक्षरी सहीत मा. संचालकांच्या स्वाक्षरी करीता सादर करावा.

७. वर नमूद कागदपत्रांसह प्रवेशप्रक्रीयेच्या परवानगीसंबंधी सोबत जोडलेल्या यादीनुसार कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव या संचालनालयास दि. २५.०७.२०१६ पर्यंत सादर करावा.

वरील बाबींची पूर्तता केल्यानंतरच संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद अटींच्या अधीन राहून नवीन अभ्यासक्रमासाठी/प्रवेशक्षमता वाढीस शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रीयेस या संचालनालयाकडून मान्यता देण्यात येईल. तरी संबंधित संस्थांनी विहित मुदतीत वर नमूद आवश्यक कागदपत्रे सादर करुन संचालनालयाची मान्यता घेण्यात यावी, अन्यथा संबंधित अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेशाबाबत संबंधित संस्थांना काही समस्या उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत -

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या विभागातील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/क्षमतावाढ/२०१६/2612
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 30 JUL 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात नमुद बाबीची पूर्तता करुन आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

**पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता वाढ करीता संचालनालयाचे परवानगीसाठी खालील प्रमाणे कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर करावीत.**

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून (AICTE)संस्थेस प्राप्त झालेल्या मान्यतेची छायांकित प्रत.
२. शासनामार्फत मिळालेल्या शासन मान्यता (GR)पत्राची झेरॉक्स प्रत.
३. सोबत जोडलेल्या नमुन्यात रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर नोंदणीकृत करारनामा (Agreement) ची मूळप्रत.
४. प्रथम वर्षासाठी शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि-४, दि. २१.०८.२०१३ मध्ये विहीत करण्यात आल्या प्रमाणे १० वर्ष मुदतीसाठी करण्यात आलेल्या संयुक्त मुदतठेवीची मूळपावती व त्याची साक्षांकित छायाप्रत.
५. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/प्रवेशक्षमता वाढीसाठी संस्थेत नियुक्ती करण्यात आल्याबाबतचे प्राचार्य व शिक्षकीय कर्मचा-यांचे रु. १००/- च्या स्टँम्प पेपरवर (शिक्षक निहाय वेगवेगळे) त्यांच्या पासपोर्ट फोटोसहीत करण्यात आलेले मूळ शपथपत्र.
६. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/प्रवेशक्षमता वाढीसाठी संस्थेत नियुक्त करण्यात आलेल्या प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे नेमणूक आदेश, रुजू अहवाल यांच्या साक्षांकित छायाप्रती.
७. सदर नवनी अभ्यासक्रमासाठी/प्रवेशक्षमता वाढीसाठी संस्थेत खरेदी करण्यात आलेली पुस्तके/साहित्याची यादी, खरेदी केल्याचे बिल, तसेच संबंधीतांस पैसे अदा केल्याबाबतच्या पावत्यांच्या साक्षांकित छायाप्रती.
८. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/प्रवेशक्षमता वाढीसाठी इमारतीचे बांधकाम क्षेत्राबाबत नोंदणीकृत आर्किटेक्टचे प्रमाणपत्र, इमारतीत वीज, पाणी, टॉयलेट, बाथरुम, लेडीजरुम इ. सुविधा असल्याबाबत प्रमाणपत्र.
९. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/प्रवेशक्षमता वाढीसाठी असलेल्या इमारतीत आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्यात आल्याबाबतची कागदपत्रे.
१०. मान्यतेसाठीचा प्रस्ताव पेपर फाईल मध्ये सादर करुन उपरोक्त अनुक्रमांकानुसार पताका (फ्लॅगिंग) करुन सादर करावीत.